2 8 NOV 2018
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# उमदा, विद्यार्थीप्रिय शिक्षक हरपला

## डॉ. एन. व्ही. चिटणीस शोकसभा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. नरसिंह वामनराव तथा एन. व्ही. चिटणीस यांच्या निधनामुळे एक अत्यंत उमदा, विद्यार्थीप्रिय शिक्षक काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी भावना विद्यापीठात सोमवारी दुपारी झालेल्या शोकसभेत व्यक्त करण्यात आली.

डॉ. चिटणीस (वय ५८) यांचे गेल्या शुक्रवारी आकस्मिक निधन झाले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शिवाजी विद्यापीठात शोकसभेचे आयोजन करण्यात आले.

आपल्या कुटुंबातीलच व्यक्ती हरपल्याचे दुःख या प्रसंगी होत असल्याची भावना व्यक्त करून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, डॉ. चिटणीसांचे व्यक्तिमत्त्व प्रसन्न व चेहरा सदैव हसरा असे. ते अतिशय उपक्रमशील शिक्षक होते. अधिविभागात त्यांनी अनेक नवीन उपक्रम राबवले. विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन दिले. प्रकृतीच्या कारणामुळे काही मर्यादा पडत असल्या तरी, कोणतेही काम त्यांनी कधी केले नाही, असे मात्र झाले नाही. अतिशय प्रामाणिक आणि स्पष्ट वक्ते शिक्षक म्हणून ते परिचित होते. त्यांच्या निधनाने विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाची अपरिमित हानी झाली आहे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सदैव हसतमुख चेहऱ्याचे डॉ. चिटणीस आता यापुढे दिसणार नाहीत, यावर विश्वास बसत नाही. त्यांच्या निधनामुळे मी एका चांगल्या मित्राला मुकलो आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. यावेळी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, निखिल भगत, गायन समाज देवल क्लबचे अरुण डोंगरे, समर्थ कशाळीकर यांच्यासह विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

28 NOV 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरविद्यापीठ कबड्डी : औरंगाबाद, नांदेड संघांची आगेकूच

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत मंगळवारी दुसऱ्या दिवशी औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवत पुढील फेरीत प्रवेश केला. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात मॅटवर हे सामने सुरू आहेत.

सकाळच्या सत्रात औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि मणिपाल विद्यापीठ, मणिपाल यांच्यात सामना झाला. एकतर्फी झालेला हा सामना औरंगाबादच्या संघाने ६३-०६ असा सुमारे ५७ गुणांनी जिंकला. नांदेड विद्यापीठाच्या संघाची लढत गुजरात विद्यापीठाशी झाली. नांदेडने हा सामना ४१-१२ असा २९ गुणांनी जिंकला.



कोल्हापूर : वीर नर्मद गुजरात विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठ या संघादरम्यान झालेल्या सामन्यातील एक क्षण. (छाया : एस. अली)

दिवसभरात झालेल्या इतर सामन्यांचे निकाल (कंसात गुण) पुढीलप्रमाणे असे : वीर नर्मद दक्षिण गुजरात विद्यापीठ विरुद्ध स्वर्णीम गुजरात क्रीडा विद्यापीठ, गांधीनगर (४१-३८), महाराजा छत्रसाल बुंदेलखंड विद्यापीठ, छत्रपूर (म. प्र.) विरुद्ध वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी (पुढे चाल), एल.एन.आय.पी.ई. विद्यापीठ, ग्वाल्हेर विरुद्ध संदीप युनिव्हर्सिटी, नाशिक (५६-३१), सौराष्ट्र विद्यापीठ, राजकोट विरुद्ध तांटिया विद्यापीठ, गंगानगर (राजस्थान) (पुढे चाल), महाराज सूरजमल ब्रिज विश्वविद्यालय विद्यापीठ, भरतपूर विरुद्ध राजस्थान केंद्रीय विद्यापीठ, अजमेर (पुढे चाल), राजीव गांधी विद्यापीठ, भोपाळ वि. वि. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी (पुढे चाल), मोहनलाल सुखाडिया विद्यापीठ, उदयपूर विरुद्ध राजस्थान कृषी विद्यापीठ, बिकानेर (५८-२१), गोवा विद्यापीठ, पणजी वि. वि. पॅसिफिक अॅकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन एन्ड रिसर्च, उदयपूर (४१-३०), हेमचंद्र उत्तर गुजरात विद्यापीठ, पाटण (गुजरात) विरुद्ध सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर, गुजरात (३५-२६), राजस्थान विद्यापीठ, जयपूर विरुद्ध महाराज गंगासिंह विद्यापीठ, बिकानेर (४२-४०).

दरम्यान, सोमवारी उद्घाटन समारंभानंतर रात्री विद्युत झोतात रंगलेल्या सामन्यांचे निकाल पुढीलप्रमाणे : भारती विद्यापीठ, पुणे विरुद्ध कच्छ विद्यापीठ, गुजरात (३४-१४), गुजरात टेक्नॉलॉजिकल विद्यापीठ, अहमदाबाद विरुद्ध डॉ. हरिसिंह गौर विद्यापीठ, सागर (४४-२२), देवी अहिल्या विद्यापीठ, इंदोर विरुद्ध एमआयटी वर्ल्ड पीस विद्यापीठ, पुणे (५१-१७), कोटा विद्यापीठ, कोटा विरुद्ध महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा (३८-१८), भूपाल नोबल विद्यापीठ, राजस्थान विरुद्ध गोविंद गुरू ट्रायबल विद्यापीठ, बन्सवारा (७१-३८), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली विरुद्ध माधव विद्यापीठ, पिंडवारा (पुढे चाल), बरकतुल्ला विद्यापीठ, भोपाळ विरुद्ध निरमा विद्यापीठ, अहमदाबाद (पुढे चाल), विक्रम विद्यापीठ, उज्जैन विरुद्ध श्री गोविंद गुरू विद्यापीठ, गुजरात (५३-०७), गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद विरुद्ध राजर्षी भतृहरी मत्स्य विद्यापीठ, अलवार (४०-२१), पारुल विद्यापीठ, गुजरात विरुद्ध सिम्बायोसिस विद्यापीठ, पुणे (पुढे चाल), राणी दुर्गावती विद्यापीठ, जबलपूर वि. वि. जिवाजी विद्यापीठ, ग्वाल्हेर (५३-११).

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा सलग दुसरा विजय

## पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धा; १८ संघ पुढील फेरीत, गुजरातच्या के.एस.विद्यापीठावर मात


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत मंगळवारी सलग दुसरा विजय नोंदविला. या संघाने गुजरातमधील गांधीनगरच्या के. एस. विद्यापीठाच्या संघावर ६१-१३ अशा गुणांनी मात केली. शिवाजी विद्यापीठ, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठासह १८ संघांनी पुढील फेरी गाठली. त्यांतील चार संघांना पुढे चाल मिळाली.

शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रातील या स्पर्धेत मंगळवारी सायंकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ आणि के. एस. विद्यापीठामध्ये सामना झाला. त्यात आक्रमक चढाई, घेराव यांच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाच्या संघाने पूर्ण सामन्यात वर्चस्व राखत के. एस. विद्यापीठाला ४८ गुणांनी पराभूत केले. शिवाजी विद्यापीठ संघाचा कर्णधार अक्षय निकम, राहुल वडार यांनी वेगवान चढाई, तर सौरभ पाटील याने उत्कृष्ट पकडी करून संघाच्या विजयाला हातभार लावला. सकाळच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने मणिपाल विद्यापीठावर ६३-०६ अशा गुणांनी एकतर्फी विजय मिळविला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने गुजरात विद्यापीठावर ४१-१२ अशा गुणांनी मात केली. मध्य प्रदेशमधील महाराजा छत्रसाल बुंदेलखंड विद्यापीठ (छत्रपूर), सौराष्ट्र विद्यापीठ (राजकोट), महाराज सूरजमल ब्रिज विश्वविद्यालय विद्यापीठ (भरतपूर), राजीव गांधी विद्यापीठ (भोपाळ) या संघांना पुढे चाल मिळाली.

अन्य निकाल असा : वीर नर्मदा दक्षिण गुजरात विद्यापीठ वि. वि. गांधीनगरचे स्वर्णीम गुजरात क्रीडा विद्यापीठ (४१-३८), एल. एन. आय. पी. ई. विद्यापीठ, ग्वाल्हेर वि. वि. संदीप युनिव्हर्सिटी, नाशिक (५६-३१), मोहनलाल सुखोडिया विद्यापीठ, उदयपूर वि. वि. राजस्थान कृषी विद्यापीठ, बिकानेर (५८-१९), गोवा विद्यापीठ वि. वि. पॅसिफिक अॅकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च, उदयपूर (४१-३०), हेमचंद्र उत्तर गुजरात विद्यापीठ, पाटण (गुजरात) वि. वि. सरदार पटेल विद्यापीठ, वल्लभ विद्यानगर गुजरात (३५-२६), राजस्थान विद्यापीठ जयपूर वि. वि. महाराज गंगासिंह विद्यापीठ बिकानेर (४२-४०).




### विद्युतझोतातील सामन्यांत संघांची बाजी

या स्पर्धेत सायंकाळच्या सत्रात विद्युतझोतात सामने झाले. त्यामध्ये संत गाडगेबाबा विद्यापीठाने १५ गुणांनी, कोटा युनिव्हर्सिटीने २६, बरकत युनिव्हर्सिटीने अवघ्या पाच, भूपाल युनिव्हर्सिटीने सात, तर ग्वाल्हेरच्या एलएनआयपीई विद्यापीठाने २५ गुणांनी विजय मिळवून बाजी मारली.



कोल्हापुरात सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या संघाने गुजरातच्या के. एस. विद्यापीठावर ४८ गुणांनी मात केली.

# विविध उपक्रमांनी संविधान दिन

कोल्हापूर टाइम्स टीम



संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्राचार्य डॉ. हरिष भालेराव आणि डॉ. श्रीकृष्ण महाजन.

संविधान दिनानिमित्त शहरातील विविध संस्था, संघटनांच्या वतीने संविधानाचे वाचन, रॅली, व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

## 'संविधानिक नैतिकता प्रस्थापित करणे गरजेचे'

'देशात उच्च प्रतीची संविधानिक नैतिकता प्रस्थापित करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने संविधान दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर प्रमुख उपस्थित होते. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर अर्थसास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे यांनी आभार मानले. वैभव कांबळे यांनी सूत्रसंचालन केले.

## संविधान प्रतीचे वाचन

दसरा चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहात संविधान प्रतीचे वाचन करून जागृती अभियान राबविण्यात आले. भाऊसाहेब काळे यांनी मनोगत व्यक्त केले. जिल्हाध्यक्ष विश्वासराव देशमुख, एम. एन. जगताप यांची भाषणे झाली. दिलीप सांगावकर, तानाजी कांबळे, प्रशांत कांबळे उपस्थित होते.

## बालावलकर प्रशाला

आर. के. बालावलकर प्रशालेत संविधानदिनानिमित्त भारतीय राज्यघटनेची माहिती देण्यात आली. मुख्याध्यापिका प्रेरणा जाधव यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. ए. ए. पुजारी यांनी प्रास्ताविक केले.

## देशभूषण हायस्कूल

देशभूषण हायस्कूल येथे संविधानदिनानिमित्त वनिता पाटील यांनी माहिती दिली. प्रथम गवंडी या विद्यार्थ्याने संविधान वाचन केले. आरती कुरणे हिने संविधानाने नागरिकांना दिलेल्या अधिकारांबाबत जागृतीपर माहिती दिली. मुख्याध्यापक रवींद्र गाट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.